गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com


# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# महाराष्ट्र सुन्न

## विमान अपघातात अजित पवारांचा मृत्यू



**पुणे -** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला बारामती इथे मोठा अपघात झाला आहे. या विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला आहे. या विमान अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. हे छोटं विमान हे जळून खाक झालं आहे. बारामती दौऱ्यासाठी ते आले होते. विमानतळाजवळच हे विमान कोसळलं. या अपघातात दादांचे दोन सहाय्यक, पायलट आणि इतर दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. या वृत्ताने राज्यालाच मोठा धक्का बसला आहे. जिल्हा परिषद आणि पंचाय समितीच्या निवडणुकीसाठी अजितदादांनी प्रचार सुरू केला होता. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस या निवडणुकीसाठी एकत्र आल्या होत्या. महानगर पालिका निवडणुकीचा निकाल पाहता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी त्यांनी प्रचाराला वेग घेतला होता. हा अपघात नेमका कशामुळे झाला. तांत्रिक बाब काय, या सर्व प्रकरणाची चौकशी विमानतळ प्रशासनाने सुरू केली आहे. हे छोटेखानी विमान लँडिंगदरम्यान विमान कोसळलं. विमानतळाजवळच हे विमान कोसळलं.

*बारामतीमधील या भीषण विमान अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. त्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. लँडिंग करताना काही तांत्रिक दोषामुळे विमान कोसळले आणि त्यात सहा जणांचा मृत्यू झाला. याठिकाणी धूराचे मोठे लोट आले. तर विमानाला मोठी आग लागली. त्यात हे विमान जळून खाक झाले. या भीषण अपघातात अजितदादांचा मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आल्याने कार्यकर्त्यांसह महाराष्ट्राला मोठा धक्का बसला. बारामती विमानतळाजवळील शेतात त्यांचे विमान कोसळले. अजितदादांच्या चार सभा होत्या. त्यासाठी ते येत होते. द*

*रम्यान हे विमान विमानतळाजवळील शेतात कोसळले. त्यावेळी लोकांनी मदतीसाठी धाव घेतली. यंत्रणा ही धावल्या. पण अपघात अत्यंत भीषण होता. मुंबईवरून ते बारामतीसाठी निघाले होते. या विमान अपघाताने पवार कुटुंबियावर शोककळा पसरली आहे. तर राज्यालाही मोठा धक्का बसला आहे. कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी तातडीने बारामतीकडे धाव घेतली. याठिकाणी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली आहे. या अपघातानंतर संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे.* राज्याला मोठा धक्का ....

बारामतीत दादांच्या चाहत्यांचा जनसागर उसळला आहे. बारामतीचे सर्व रस्ते फुल झाले आहेत. आज सायंकाळी रुग्णालयातून विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अंत्य दर्शनासाठी आणण्यात आले होते. यावेळी संपूर्ण कुटुंबासह राज्यभरातून आलेल्या सर्व नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. यानंतर आता पुन्हा एकदा अजित दादांचे पार्थिव रूग्णालयात आणण्यात आले आहे.

**जय पवाराच्या डोळ्यात पाणी**

अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार आणि पार्थ पवार यांनी अजित दादांचे पार्थिव पुन्हा रुग्णालयात नेले जाणार असल्याची माहिती दिली. यावेळी जय पवारांच्या डोळ्यात पाणी आले होते. जय पवार यांनी म्हटले की, मी आपल्या सर्वांच आभार मानतो. तुम्ही सर्वांना कायम दादांबद्दल प्रेम दाखवलं आहे, ते आज मला दिसून येत आहे. दादा आपल्या सर्वांच्या मनात आणि हृदयामध्ये आहेत. आपल्याला त्यांच्यासाठी भविष्यात ते जसे आजपर्यंत लढत आलेत तसं लढायचं आहे. उद्या सकाळी ११ वाजता तुम्ही पुन्हा इथे या असं म्हणताच जय पवार यांच्या डोळ्यात पाणी आले.

**सर्वांनी शांतता राखा - पार्थ पवार**

अजित पवारांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी म्हटले की, ‘उद्या पुन्हा आपण सर्वजण इथे १० वाजता जमणार आहोत. सर्वांनी शांतता राखावी अशी मी तुम्हाला विनंती करतो. शिस्तीत इथून बाहेर पडा. आम्ही सगळे इथे परत येणार आहोत. आता दादांचे पार्थिव रुग्णालयात नेले जाणार आहे. आम्हाला तुमचं सहकार्य हवं आहे. सर्वांनी एकमेकांना सहकार्य करा, चेंगराचेंगरी करू नका, महिलांना ढकलू नका.’

**उद्या अंत्यसंस्कार होणार**

दरम्यान, आता उद्या सकाळी ११ वाजता अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तत्पूर्वी आज बारामतीत अजित पवार यांच्या चाहत्यांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. राज्यात ३ दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. तसेच राज्यातील अनेक भागात कडकडीत बंद पाळण्यात आला.

**कर्तृत्वान व्यक्तीला महाराष्ट्र मुकला -शरद पवार**

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा तथा खासदार शरद पवार यांनी अजित पवारांच्या निधनावर प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्राचं कधीही न भरुन येणारं नुकसान असल्याचं त्यांनी म्हटलं.

अजित पवारांच्या अकाली निधनाने पवार कुटुंबीयांसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी, नेते आणि कार्यकर्त्यांवर हा मोठा आघात झाला. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील कार्यकर्ता धाय मोकलून रडत आहे, तर बारामती आणि बीड जिल्ह्यातील नागरिकांनी बंद पाळून आपला शोक व्यक्त केला. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना दिल्लीतच ही बातमी समजली. त्यानंतर, ते आपल्या कुटुंबीयांसह तात्काळ बारामतीकडे परतले. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर शरद पवार यांनी दुःखद घटनेबाबत प्रतिक्रिया दिली. अजित पवारांचं निधन महाराष्ट्राचं मोठं नुकसान, हे कधीही भरुन न निघणारं नुकसान आहे, असे शरद पवार यांनी म्हटले. कातरलेल्या आवाजात, डोळ्यातील पाणी डोळ्यातच साठवत शरद पवारांनी महाराष्ट्रासाठी ही प्रतिक्रिया दिली. तसेच, हा केवळ अपघात आहे, याच्यात राजकारण नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

हा अपघाती मृत्यू महाराष्ट्राला प्रचंड असा धक्का आहे. एक कर्तृत्ववान निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र मुकला. जे काही नुकसान झालं ते भरुन निघणारं नाही. पण सगळ्याच गोष्टी आपल्या हातात नसतात. हा अपघात यामागे काही राजकारण आहे अशाप्रकारची भूमिका मांडली गेली. याच्यात राजकारण नाही, हा निव्वळ अपघात आहे. त्याच्या यातना महाराष्ट्राला, आम्हा सगळ्यांना आहेत. कृपा करुन इथं राजकारण आणू नये, अशा शब्दात शरद पवारांनी अपघातावर प्रतिक्रिया दिली.

**शरद पवारांनी रनवेवर घेतली माहिती**

शरद पवार बारामती विमानतळावर पोहोचताच त्यांनी तिथे उपस्थित असलेल्या लोकांकडून माहिती घेतली. रनवेवर असतानाच शरद पवारांनी ही माहिती घेतली. अजितचं विमान कसं आणि कुठे कोसळलं असा प्रश्न त्यांनी विचारला. त्यावर रन वे ज्या ठिकाणी संपतो त्याच्या आधी एक किमी अंतरावर विमानाचा अपघात झाला. त्या ठिकाणी असलेल्या बाजूच्या खोलगट भागात हा अपघात झाल्याची माहिती शरद पवारांना देण्यात आलं.शरद पवार यावेळी काहीसे भावुक झाल्याचं दिसून आलं. दरम्यान, अजित पवारांच्या अकाली निधनानंतर खासदार सुप्रिया सुळे आणि पान २ वर

## सर्वपक्षीय जालना बंदचे आवाहन

**जालना | प्रतिनिधी -** जालना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार यांचा दुर्दैवी विमान अपघातात निधन झाले आहे , दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहे या दिवशी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून जालना बंद चे सर्वपक्षीय आवाहन करण्यात आले आहे.

स्व. अजितदादा पवार यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिलेले आहे . महाराष्ट्र राज्य विकसित राज्य म्हणून ओळख व्हावी म्हणून त्यांनी पुरेपूर प्रयत्न केलेले आहेत राज्याचा एक कर्तबगार आणि एक वचनी नेता ते होते , सामान्य जनता आणि शेतकरी , कष्टकरी जनतेचे प्रश्न मार्गी लागावी म्हणून सातत्याने प्रयत्नशील होते शिव , शाहू , फुले , आंबेडकर आणि धर्मनिरपेक्ष विचार समाजामध्ये रुजवून बंधूभावाची भावना त्यांनी रुजविण्याचा प्रयत्न केला त्यांच्या जाण्यामुळे महाराष्ट्र राज्य पोरका झाला असून राज्याचे अतोनात नुकसान झालेले आहे , एक संवेदनशील आणि सच्चा नेता हरपल्यामुळे जनतेमध्ये दुःखाची लाट पसरली आहे , स्व. अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून जालना बंद पाळण्यात यावा असे सर्वपक्षीय आवाहन करण्यात येत आहेत. खा. डॉ. कल्याणराव काळे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आ. अर्जुनराव खोतकर, माजी मंत्री राजेश टोपे, आ. बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, आ. संतोष दानवे , आ. डॉ. हिकमत उढाण, माजी आ. कैलास गोरंट्याल, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण, पान २ वर

# खा. काळे, आ. खोतकर, दानवे यांच्यासह जालन्यात अजित पवारांना श्रद्धांजली

**जालना | प्रतिनिधी -** ‘‘राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या दुःखद निधनाची बातमी अत्यंत धक्कादायक आणि वेदनादायी आहे. एका क्षणात महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक प्रभावी, अनुभवी आणि कर्तृत्ववान नेतृत्व आपल्यातून निघून गेले. अजितदादा पवार हे प्रशासन, विकास आणि जनहिताच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारे नेते होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे राज्याच्या राजकीय व सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही हानी दीर्घकाळ जाणवत राहील. या दुःखद घटनेने संपूर्ण महाराष्ट्र शोकमग्न झाला असून, शब्द अपुरे पडावेत अशी ही वेदना आहे. ईश्वर दिवंगत आत्म्यास सद्गती देवो.’’ अशा शब्दात खासदार डॉ. कल्याण काळे यांनी दुख व्यक्त केले.

**महाराष्ट्र महान नेत्याला मुकला - आ. खोतकर**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याची अत्यंत दुःखद, धक्कादायक आणि वेदनादायी बातमी सकाळी सकाळीच कळली. मन सुन्न झाले. महाराष्ट्र एका महान नेत्याला मुकला आहे. दादा स्पष्टवक्ते, विकासाभिमुख लोकनेते होते, हे महाराष्ट्र आणि देशाला माहित आहे. लोकशाहीवर ठाम विश्वास असलेल्या या महान नेतृत्वाचा दुर्दैवी अंत झाला आहे. चाळीस वर्षे विधानसभा सभागृहाच्या निमित्ताने त्यांच्याशी संपर्क राहिला आहे. अलीकडे दादा आमच्या घरी आले होते. स्वच्छतेच्या दृष्टीने दादा काही टिपणी करतील म्हणून आधीच काळजी घेतली होती. त्यांचा शासन आणि प्रशासनात नैतिक दरारा होता. कडक शिस्तीचे वाटणारे दादा तेवढेच प्रेमळही होते. एका महान नेत्यास महाराष्ट्र मुकला असून राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. पवार कुटुंब आणि महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, ही प्रार्थना.

भावपूर्ण श्रद्धांजली...

**कणखर, शिस्तबद्ध नेतृत्त्व गमावलं - भास्कर दानवे**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्याची अत्यंत दुःखद व वेदनादायक घटना समोर आली आहे. या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाल्याने महाराष्ट्राने एक कणखर, शिस्तबद्ध व दूरदृष्टी असलेले नेतृत्व गमावले आहे. कडक प्रशासक म्हणून ओळख असलेले अजितदादा पवार यांनी आपल्या कार्यकाळात राज्याच्या विकासाला गती देत जनहिताच्या अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांद्वारे महाराष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे. या दुःखद प्रसंगी आम्ही त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, हीच प्रार्थना करतो.

**महाराष्ट्रावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला - रविंद्र तौर**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याचे वृत्त अत्यंत धक्कादायक आहे. महाराष्ट्रावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. या कठीण प्रसंगी संपूर्ण पवार कुटुंबाच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत.माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याला सन्मानपूर्वक वागणूक देऊन पक्षाचे कार्य करण्याची संधी दिली व मी ज्या ज्या वेळेस कोणत्याही गोष्टीचा आग्रह धरला त्या आग्रहाखातर माझा शब्द पाळला, माझे घरी, दवाखान्यात व इतर कोणत्याही ठिकाणी मी आपणास आग्रहाचे निमंत्रण दिले त्या त्या वेळी आपण मला भरभरून वेळ दिला असा आपला दिलदारपणा मनाला नेहमीच भावला आहे. पण काळाने अचानक आम्हाला पोरकं केले आहे.दादांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना !

दिलेला शब्द पाळणारे, हजरजबाबी, दिलखुलास, भेदक, रूबाबदार, स्पष्टवक्ते, कर्तबगार, मनमोकळे, तडफदार आणि प्रशासनावर वचक असलेले नेतृत्व आज हरपले आहे. दादा, तुमच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी शब्दांत मांडता येणार नाही ती कधीही भरून निघणारी नाही. जनतेसाठी अखंड झटणारे, निर्णयक्षम व धैर्यशील नेतृत्व म्हणून तुमची आठवण सदैव राहील.

**भावपूर्ण श्रद्धांजली- राजेंद्र जाधवराव**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व अजितदादा पवार यांचे विमान अपघाताने दुःखद निधन झाल्याने घनसावंगी शहरासह मतदार संघातील व्यापाऱ्यांनी सकाळी दहा ते दुपारी बारा वाजेपर्यंत आपली दुकाने बंद ठेवून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करावी अशी कळकळीची विनंती सर्वांना करतो.

## ‘प्रशासकीय दादा’

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती जवळ विमान कोसळून झालेल्या अपघातात निधन झाले. त्यांच्यासह विमानात असलेले सहकारी देखील या अपघातात दगावले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सेवेमुळे, कामानिमित्त दादांशी अनेकदा संबंध येत असे. त्यांची काही जाणवणारी ठळक वैशिष्ट्ये म्हणजे ते अतिशय वक्तशीर होते. तसेच कामाच्या बाबतीत त्यांना अजागळपणा अजिबात खपत नसे. त्यांच्या रोखठोकपणे बोलण्याच्या सवयीमुळे, विषयाच्या सखोल अभ्यासामुळे त्यांच्याकडे जाणारे अधिकारी अभ्यास करूनच जात असत. आमच्या बाबतीत बोलायचे झाले तर स्वतः दादांचा शुद्ध लेखनावर फार भर असे. कित्येकदा आमच्या मसुद्यातील ऱ्हस्व दीर्घ, अन्य चुका ते शोधून काढत आणि स्वतःच्या पेनाने दुरुस्त करून मसुदा परत देत असत. खरे म्हणजे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री यानी इतक्या बारकाईने मसुदा वाचणे अपेक्षित नसते. पण या बाबतीत दादांचा फार कटाक्ष असे. दादांनी ज्या ज्या खात्यांची मंत्री पदे भूषविली, त्या त्या सर्व पदांना त्यांनी न्याय दिला. बघतो, सांगतो अशी टोलवाटोलवी ते कधी करीत नसत. काम होण्यासारखे असेल तर लगेच झाले पाहिजे आणि होण्यासारखे नसेल तर स्पष्टपणे नाही सांगून मोकळे झाले पाहिजे, असे ते अधिकाऱ्यांना जसे सांगत असत, तसेच ते स्वतः ही आचरणात आणत असत. वर करणी कठोर, रोखठोक वाटणारे दादा वेळ प्रसंग पाहून मिश्किलपणे देखील बोलत असत. मुख्यमंत्री पद हुलकावणी देत असल्याबद्दल त्यांच्या मनात खंत असे. स्वतः अनेक वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवलेले दादाएकदा जाहीरपणे बोलताना, ‘‘आमची गाडी उपमुख्यमंत्री पदावर येऊनच अडकत असते ‘‘ असे मिश्किलपणे बोलले होते. काही महिन्यांपूर्वी दादांचे अनेक वर्षे जनसंपर्क अधिकारी राहिलेले आमचे सहकारी संजय देशमुख यांचे अकस्मात निधन झाले, त्यावेळी दादा मुंबई बाहेर होते. पण मुंबईत आल्या आल्या, त्यांनी पहिली गोष्ट केली म्हणजे, ती म्हणजे देशमुख यांच्या घरी जाऊन त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले. काही मदत लागली तर ती हक्काने सांगा, असे म्हणुन धीर दिला.त्यांनी लगेच तशा सूचना त्यांच्या खाजगी सचिवांना दिल्या.आता स्वतः दादाच गेले. त्यांच्याबद्दल लिहू तितके थोडेच. असो. दादांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**-देवेंद्र भुजबळ**
**निवृत्त माहिती संचालक, नवी मुंबई.**

संपादकीय पान

# एका झटक्यात हरपलेला बुलंद आवाज

## अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्र सुन्न

महाराष्ट्राच्या राजकारणात ठामपणे उभा राहणारा, निर्णयक्षमतेसाठी ओळखला जाणारा आणि जनतेशी थेट संवाद साधणारा नेता म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ओळख होती. त्यांच्या आकस्मिक निधनाच्या वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. हा केवळ एका नेत्याचा मृत्यू नसून, तो एका प्रभावी राजकीय युगाच्या अचानक पडलेल्या पडद्यासारखा आहे. राजकारणात अनेक चढ-उतार पाहिलेले अजित पवार हे नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. त्यांच्या निर्णयांवर टीका झाली, समर्थनही झाले; मात्र त्यांच्या कार्यक्षमता आणि प्रशासकीय पकडीवर कोणीही शंका घेऊ शकत नव्हते. जलसंपदा, अर्थकारण, ग्रामीण विकास यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात त्यांनी घेतलेले निर्णय आजही राज्याच्या कारभारावर ठसा उमटवून आहेत. त्यांच्या निधनामुळे सर्वाधिक मोठी पोकळी निर्माण झाली आहे ती म्हणजे अनुभवी आणि धाडसी नेतृत्वाची. संकटाच्या काळात ठाम भूमिका घेण्याची क्षमता, अधिकारी वर्गावर असलेली पकड आणि राजकीय विरोधकांनाही विचार करायला लावणारी शैली ही त्यांची वैशिष्ट्ये होती. आज राज्यातील राजकारण पक्षभेद विसरून शोकसागरात बुडाले आहे. विरोधकही त्यांच्या कार्याचा सन्मान करत आहेत, हीच बाब त्यांच्या राजकीय उंचीची साक्ष देणारी आहे. हे दृश्य क्वचितच पाहायला मिळते. अजित पवार यांचा प्रवास हा संघर्ष, वाद, यश आणि अपयशांनी भरलेला होता. मात्र प्रत्येक टप्प्यावर त्यांनी स्वतःला सिद्ध केले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी लवकर भरून निघणे अशक्यप्राय आहे. आज महाराष्ट्र फक्त एका नेत्याला नाही, तर एका निर्भीड प्रशासकाला, परखड वक्त्याला आणि जनतेशी नाळ जोडणाऱ्या लोकनेत्याला गमावत आहे. ही वेळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांची नसून, आत्मपरीक्षणाची आहे. लोकनेत्यांचे आयुष्य किती अनिश्चित असते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. सत्ता, पद, प्रतिष्ठा क्षणभंगुर आहेत; मात्र जनतेसाठी केलेले कार्यच खरे शाश्वत असते. अजित पवार यांच्या स्मृतीस खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांनी ज्या विकासाभिमुख महाराष्ट्राचे स्वप्न पाहिले, त्या दिशेने प्रामाणिकपणे वाटचाल करणे. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात त्यांचे नाव कायम स्मरणात राहील. अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**दीपक शेळके, संपादक युवा आदर्श**

# महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धुरंधर नेतृत्व पडद्याआड

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या तीन दशकांहून अधिक काळ आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे नाव म्हणजे अजित अनंतराव पवार. रोखठोक बोलणे, प्रशासनावर असलेली जबरदस्त पकड आणि कार्यकर्त्यांचे मोठे जाळे ही त्यांची ओळख. दादा या नावाने लोकप्रिय असलेल्या या नेत्याचा राजकीय प्रवास हा जिद्द आणि अचूक नियोजनाचा एक उत्तम नमुना होता...

अजित दादा यांची ओळख एक कडक प्रशासक अशी आहे. मंत्रालयात सकाळी ७ वाजता कामाला सुरुवात करण्याचा त्यांचा परिपाठ असो किंवा अधिकाऱ्यांकडून वेळेत काम करून घेण्याची पद्धत, त्यांच्या कामाचा वेग अनेकांना थक्क करतो. ''दिलेला शब्द पाळणारा नेता'' ही त्यांची प्रतिमा जनमानसात आजही कायम आहे आणि आजीवन स्मरणात राहील...

पुणे जिल्ह्याचा, विशेषतः बारामतीचा झालेला कायापालट हा अजित पवारांच्या दूरदृष्टीचा पुरावा आहे. रस्ते, शिक्षण, आरोग्य आणि उद्योग या क्षेत्रांत त्यांनी केलेले काम हे विकासाचे एक मॉडेल मानले जाते. केवळ घोषणा न करता, निधीचे योग्य नियोजन करून कामे कशी पूर्ण करावीत, याचे कौशल्य त्यांच्याकडे होते...

राजकारणात त्यांना धुरंधर म्हटले जाते, कारण बदलत्या राजकीय परिस्थितीनुसार आपले स्थान टिकवून ठेवण्याचे आणि पक्षाला बळकटी देण्याचे तंत्र त्यांना अवगत आहे. अनेकदा सत्तेच्या केंद्रस्थानी राहून त्यांनी राज्याची धोरणे ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मग ते उपमुख्यमंत्री पद असो किंवा अर्थमंत्री म्हणून मांडलेला अर्थसंकल्प, त्यांचा अभ्यास नेहमीच सखोल होता...

अजित पवारांचे सर्वात मोठे बलस्थान म्हणजे त्यांचे तळागाळातील कार्यकर्ते. कार्यकर्त्याच्या सुख-दुखात धावून जाणे आणि त्यांच्या कामासाठी थेट फोन उचलून प्रश्न मार्गी लावणे, यामुळे त्यांच्याबद्दल एक निष्ठेची भावना निर्माण झाली आहे. सत्तेत असो वा नसो, त्यांचा जनसंपर्क कधीही तुटत नव्हता...

अजित पवार आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. अनेकदा त्यांचे विधान चर्चेचा विषय ठरते, परंतु त्यांच्या शब्दांत जी पारदर्शकता असते, ती आजच्या राजकारणात दुर्मिळ मानली जाते. जे मनात आहे तेच ओठावर, अशा स्वभावामुळे त्यांच्या समर्थकांचा त्यांच्यावर मोठा विश्वास होता...

महाराष्ट्राच्या राजकारणातील अनेक वादळांना अंगावर घेत अजित पवार यांनी आपले नेतृत्व सिद्ध केले आहे. केवळ सत्तेचे राजकारण न करता विकासाचे राजकारण करणारा हा नेता महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर आजही तितकाच प्रभावी आहे. एक अभ्यासू अर्थमंत्री आणि कणखर लोकनेता म्हणून त्यांचा प्रवास येणाऱ्या पिढीतील राजकारण्यांसाठी प्रेरणादायी नक्की ठरेल...

आजचा दिवस म्हणजे राजकारणातील काळा दिवस, राज्याचे कार्यसक्षम उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अपघाती मृत्यू झाला. २२ जुलै १९५९ जन्म झाला होता आणि २८ जानेवारी २०२६ रोजी अखेरचा श्वास घेतला... दादाला लाभलेले आयुष्य ६६ वर्ष ६ महिने आणि ६ दिवस...

दादांना हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

**शेख अब्दुल रहीम,**
**संस्थापक अध्यक्षःहॅप्पी टू हेल्प फाउंडेशन**
**मोः ९६५७५२४५४५**

पान १ वरुन

## महाराष्ट्र सुन्न ...

सुनेत्रा पवार यांच्याही अश्रूचा बांध फुटला, ते पाहून सगळेच भावुक झाले होते.

**अपघाताचे व्हिडीओ सांगताहेत..**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला आहे, आज सकाळी ही दुर्दैवी घटना घडली, या अपघातामध्ये अजित पवार यांच्यासह विमानात असलेल्या पाच जणांचा मृत्यू झाला आहे. अजित पवार मुंबईवरून बारामतीकडे निघाले होते, मात्र हे विमान बारामतीमध्ये धावपट्टीवर उतरत असतानाच हा अपघात झाला, विमान धावपट्टीवर उतर असताना विमानाचं नियंत्रण सुटलं. विमान थेट जमिनीवर धडकलं विमान जमिनीवर धडकताच मोठा स्फोट झाला, त्यानंतर या वमिानाला भीषण आग लागली. या अपघातामध्ये अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेत पायलटचा देखील मृत्यू झाला आहे. दरम्यान अपघात झाल्यानंतर हा अपघात नेमका कसा झाला? याचा एक व्हिडीओ समोर आला होता, सीसीटीव्ही फुटेज समोर आलं होतं.

जिथे अपघात झाला तिथे शेताजवळ असलेल्या एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही घटना कैद झाली आहे. सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांनी हा अपघात झाल्याचं पहिल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे. अपघातावेळी घटनास्थळी मोठा स्फोट झाला आणि विमानाने पेट घेतला. अपघातापूर्वी हे विमान हवेत घिरट्या घालत होतं, असं देखील या व्हिडीओमध्ये पहायला मिळत आहे.

दरम्यान त्यानंतर आता अजित पवार यांच्या विमान अपघाताचा एक नवा व्हिडीओ समोर आला आहे. ज्यामध्ये हवेतच हे विमान तिरक झाल्याचं दिसून येत आहे. हे विमान तिरकं झाल्यानंतर काही वेळातच हे विमान जमिनीवर कोसळलं. या संपूर्ण रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे असल्यामुळे ही अपघाताची घटना या सीसीटीव्हीमध्ये कैद झाली. धावपट्टीवर उतरत असताना विमानाचं नियंत्रण सुटलं आणि विमान जमिनीला धडकलं. विमान जमिनीला धडकताच मोठा स्फोट झाला, आणि त्यानंतर वमिानाला आग लागली. दरम्यान कमी दृश्यमानतेमुळे हा अपघात झाला असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अपघाताच्या तपासाला सुरुवात झाल्याची माहिती नगरिक विमान वाहतूक मंत्र्यांकडून देण्यात आली आहे. या अपघातामध्ये अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

**बीड मधील बाजारपेठा बंद; शिवछत्र निवासस्थानाबाहेर कार्यकर्त्यांची गर्दी, अजित पवारांची आठवण सांगताना अश्रू अनावर**

अजित पवारांच्या निधनाचे वृत्त समजताच बीड मधील बाजारपेठा व्यापाऱ्यांनी स्वतः बंद केल्या. तर दुसरीकडे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शिवछत्र निवासस्थानी कार्यकर्त्यांनी गर्दी केली. मागील वर्षभरापासून अजित पवार बीडचे पालकमंत्री होते. त्यामुळे तळागाळातील कार्यकर्त्यांशी त्यांची नाळ जुळली होती. बीडकरांनी अजितदादांच्या शब्दाला मान देऊन नगरपालिका त्यांच्या हाती सोपवली. हे सर्व सांगत असताना बीड मधील कार्यकर्त्यांना अश्रू अनावर होत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाला शाप आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे, विनायक मेटे आणि आता अजित दादा आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना आता राजकीय पालक मिळणार नाही. महाराष्ट्राच्या राजकारणाची दुर्दशा ही भरून निघणार नाही अशा शब्दात कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची कधीही भरून न निघणारी हानी : नितीन गडकरी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार जी यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक, दुर्दैवी आणि दुःखद आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. गेली अनेक वर्षं राज्याच्या विधिमंडळात सोबत काम करताना अजितदादांशी अतिशय जवळचा संबंध राहिला आहे. त्यांचे प्रशासनिक कौशल्य, विकासात्मक दृष्टिकोन आणि लोकांना जोडण्याची हातोटी यांमुळे अजितदादांचे कायमच महाराष्ट्राच्या राजकारणात एक अढळ स्थान राहिले आहे. महाराष्ट्राच्या विकासाची आकांक्षा असलेल्या या लोकनेत्याचे अकाली निधन होणे, ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची कधीही भरून न निघणारी हानी आहे. या दुःखद प्रसंगी संपूर्ण पवार कुटुंबीयांसोबत माझ्या संवेदना आहेत. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती प्रदान करो. ॐ शांती

**दमदार अन् दिलदार मित्र सोडून गेला - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

''महाराष्ट्रातील प्रश्नांची जाण असलेला नेता आज हरपला. संपूर्ण राज्यावर शोककळा. दमदार आणि दिलदार मित्र सोडून गेला. कुटुंबावर मोठा आघात आहे. मी आणि एकनाथ शिंदे लवकरच बारामतीच्या दिशेनं निघणार आहोत. अजितदादांचं निधन मनाला चटका लावणारं आहे'', अशी दुःखद भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

**एक खंबीर नेता व माझ्या मंत्रिमंडळातील उमदा सहकारी गमावला,' उद्धव ठाकरेंकडून अजित पवार यांना आदरांजली**

खंबीर नेता, उमदा सहकारी गमावला! ''एक खंबीर नेता व माझ्या मंत्रिमंडळातील उमदा सहकारी गमावला,'' अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात अजित पवार हे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री होते. अत्यंत शिस्तप्रिय, आपल्या खात्यावर वचक व अर्थ विभागाचा अभ्यास असणारे ते नेते होते. एक उत्तम सहकारी म्हणून त्यांचे माझे विशेष नाते जमले. अजित पवार हे दिलखुलास होते. मनात येईल ते बोलायचे. ते दीर्घद्वेषी नव्हते. राजकारणात त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारला, तरी त्यांनी संबंध तुटू दिले नाहीत, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. महाराष्ट्रात ते 'दादा' म्हणून लोकप्रिय होते. ते असे अकाली जातील असे वाटले नव्हते. कार्यकर्त्यांना जपणारा नेता म्हणून ते परिचित होते. त्यांच्या जाण्याने राज्यातील नेतृत्वात पोकळी निर्माण झाली. ते सर्वार्थाने 'दादा' होते. दादांना माझ्यातर्फे, 'ठाकरे' व शिवसेना परिवारातर्फे श्रद्धांजली!

**महाराष्ट्राच्या राजकारणाने एक उमदा नेता गमावला; राज ठाकरेंकडून आदरांजली**

माझे मित्र आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं निधन झालं. महाराष्ट्राच्या राजकारणाने एक उमदा नेता गमावला. अजित पवार यांचा आणि माझा राजकारणातला प्रवेश हा काहीसा एकाच काळातील, अर्थात आमचा परिचय हा बराच नंतरचा. पण राजकारणावर कमालीचं प्रेम या एका गुणावर अजित पवारांनी महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठी झेप घेतली. अजित पवार हे पवार साहेबांच्या मुशीत जरी तयार झालेले नेते असले, तरी त्यांनी नंतर स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. आणि ही ओळख महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ठसवली. १९९० च्या दशकांत महाराष्ट्रात शहरीकरणाने वेग पकडला. ग्रामीण भाग अर्धशहरीपणाकडे झुकू लागला, तरी तिथल्या राजकारणाचा बाज हा ग्रामीणच होता, जरी तिथल्या प्रश्नांचं स्वरूप हे काहीसं शहरी होत चाललं असलं तरी. या पद्धतीच्या राजकारणाचा पूर्ण अंदाज आणि ते उत्तम पद्धतीने कसं हाताळायचं याचं कसब अजित पवारांकडे होतं. पिंपरी चिंचवड आणि बारामती ही त्याची दोन उत्तम उदाहरणं. पिंपरी चिंचवड असेल की बारामती असेल अजित दादांनी या भागांचा कायापालट केला हे त्यांचे राजकीय विरोधक पण मान्य करतील. प्रशासनावर अचूक पकड आणि एखाद्या फाईलीचा गुंता सोडवताना त्याची गाठ नक्की कुठून सोडवायची याचं अचूक ज्ञान असलेला हा नेता होता. प्रशासन हे सत्ताधाऱ्यांच्या पेक्षा वरचढ होण्याच्या काळात असा नेता महाराष्ट्राने गमावणं हे अतिशय दुर्दैवी आहे.

अजित पवार हे कमालीचे स्पष्टवक्ते होते. काम होणार नसेल तर ते तोंडावर सांगायचं आणि होणार असेल तर त्यासाठी ते सगळी शक्ती लावायचे. आश्वासनं देऊन स्वतः भोवती माणसांचा पिंगा घालायचा हा त्यांचा स्वभाव नव्हता. राजकारणात सडेतोडपणाची आणि स्पष्टवक्तेपणाची किंमत मोजावी लागते, त्याचा अनुभव मला पण आहे आणि त्यामुळे ती अजित पवारांना पण किती मोजायला लागली असेल याचा अंदाज करता येतो. अजित पवारांच मला आवडणारं अजून एक वैशिट्य म्हणजे ते अजिबात जातीय नव्हते आणि त्यांच्या राजकरणात जातीपातीला अजिबात स्थान नव्हतं. सध्याच्या राजकारणात जातपात न मानता राजकारण करण्याचं धारिष्ट्य दाखवणारेच नेते कमी उरलेत, त्यात अजित पवार हे अग्रणी होते हे नक्की. राजकारणातला विरोध हा राजकीय असतो, तो व्यक्तिगत नसतो. त्यामुळे एकमेकांवरची जहरी टीका ही व्यक्तिगत घ्यायची नसते, हे भान असलेले नेते महाराष्ट्रात कमी होत चालले आहेत. राजकारणातले दिलदार विरोधक एका मागे एक जाणे हे महाराष्ट्राच्या उमद्या राजकारणाचं मोठं नुकसान आहे. मी आणि माझं कुटुंबीय पवार कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे अजित पवारांना भावपुर्ण श्रद्धांजली.

**आजही दादांच्या नसण्याची कल्पना मनाला मान्य होत नाही; चंद्रशेखर बावनकुळेंची भावनिक पोस्ट**

कालची दादांची आणि माझी शेवटची भेट पायाभूत सुविधा समितीच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी मुख्यमंत्री यांच्यासमवेत आम्ही सर्व उपस्थित होतो. नेहमीप्रमाणे दादांचा आत्मविश्वास, मिश्कीलपण आणि कामावरील पकड तशीच होती. कोणालाही कल्पना नव्हती की ती भेट शेवटची ठरणार आहे. आजही दादांच्या नसण्याची कल्पना मनाला मान्य होत नाही. क्षणोक्षणी वाटत राहते आता दादांचा फोन येईल, एखाद्या मुद्द्यावर ठाम शब्दांत चर्चा करतील, नेहमीसारखं हसत म्हणतील, ''चला, कामाला लागूया.'' दादा आपली ही धक्कादायक एक्झिट आम्हाला मान्य नाही. महाराष्ट्राच्या विकासासाठी अखंड झटणारा, निर्णयक्षम नेतृत्वाचा आधार अचानक हरपल्याची पोकळी शब्दांत मांडता येणार नाही. तुमची आठवण नेहमी येईल, तुमची उणीव नेहमी जाणवत राहील.

**दादा तुमचं नाव हृदयात कायम कोरलेलं राहील..!; डॉ. अमोल कोल्हे यांच्याकडून अजित पवारांना श्रद्धांजली**

''महाराष्ट्राच्या विकासपुरुषास भावपूर्ण श्रद्धांजली..! महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, संपूर्ण राज्याचे लाडके आणि हक्काचे दादा मा. अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनाची बातमी अतिशय क्लेशदायक आहे. खरतर अजूनही विश्वास बसत नाही की अजित दादा आता आपल्यात नाहीत. संपूर्ण महाराष्ट्राने आज एक उत्तम प्रशासक, शिस्तशील नेतृत्व आणि जनतेसाठी भल्या पहाटेपासूनच काम करणारा हक्काचा माणूस गमावला आहे. दादा तुमचे हे अकाली जाणे सर्वसामान्य जनतेलाही बिलकुल रुचले नाही. आज फक्त बारामतीकरच नव्हे तर राज्यातील प्रत्येक सर्वसामान्याच्या डोळ्यात अश्रू आहेत आणि सोबतच पोरकेपणाची भावना आहे. ज्या माणसाने आयुष्याचा प्रत्येक क्षण महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि फाईल्सचा निपटारा करण्यासाठी वेचला, तो आवाज आज शांत झाला, यावर विश्वासच बसत नाही. दादांचा स्वभाव अनेकांना कडक वाटला असेल, पण त्या कडकपणामागे राज्याच्या हिताची कळकळ आणि कार्यकर्त्यांबद्दलचा जिव्हाळा होता. राजकारणात शब्द बदलणारे खूप पाहिले, पण ''दादांनी शब्द दिला म्हणजे काम होणारच'' हा जनतेचा विश्वास आता कायमचा स्मृती बनला आहे. मंत्रालयातील त्या रिकाम्या दालनस देखील अजित पवार यांच्यासारख्या कार्यशील व कर्तृत्वान नेतृत्वाची कायम उणीव भासेल. दादा तुमचं नाव हृदयात कायम कोरलेलं राहील..!'', अशी भावनिक पोस्ट शेअर करत डॉ. अमोल कोल्हे यांनी अजित पवारांना श्रद्धांजली वाहिली.

**अजित पवारांचे जाणे धक्कादायक; प्रकाश आंबेडकरांकडून श्रद्धांजली**

राज्याच्या राजकारणातून एक अत्यंत दुर्दैवी आणि सुन्न करणारी बातमी समोर येत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज सकाळी बारामती विमानतळाजवळ झालेल्या भीषण विमान अपघातात निधन झाले आहे.

या धक्कादायक घटनेवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या ट्विटर हँडलवरून शोक व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, ''अजित पवार यांच्या अचानक झालेल्या निधनाने मला खूप धक्का बसला आहे. अजित पवारांची काम करण्याची एक स्वतःची वेगळी आणि शिस्तबद्ध शैली होती, हे नाकारता येणार नाही.'' ''त्यांच्या पत्नी, कुटुंब, मित्र आणि पक्षाच्या दुःखात मी सहभागी आहे'' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या भीषण विमान अपघातात अजित पवारांसह इतर ५ जणांनाही आपले प्राण गमवावे लागले आहेत. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रकाश आंबेडकर यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, ''ज्या विमान अपघातात ६ जणांचा बळी गेला, त्या घटनेची अत्यंत योग्य आणि सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. प्रशासनावर पकड असलेला नेता म्हणून त्यांची ओळख होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनाने महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे.

**अजित पवार यांच्या निधनानंतर नितेश राणे यांनी पोस्ट शेअर करून श्रद्धांजली वाहिली**

''महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक आणि दुःखद आहे. त्यांच्या निधनाने जवळपास चारहून अधिक दशके महाराष्ट्राच्या समाजकारणात सेवा देणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व हरपले. प्रशासनावर असलेली त्यांची पकड, सहकार क्षेत्राची जाण, निर्णयक्षमता आणि कामातील शिस्त तसेच जनसामान्यांसाठी अखंड झटण्याची वृत्ती यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले होते. राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय, दाखवलेली कार्यतत्परता आणि जबाबदारीची जाणीव असंख्य कार्यकर्त्यांसाठी पथदर्शी ठरेल. त्यांचे विचार, कार्य आणि नेतृत्वाचा ठसा हा महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासावर कायमस्वरूपी कोरला गेलेला आहे. अजितदादा पवार यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली! त्यांच्या आत्म्यास शांती लाभो तसेच या दुःखातून सावरण्याचे त्यांच्या कुटुंबीयांना बळ मिळो अशी ईश्वर चरणी प्रार्थना'', अशी पोस्ट शेअर करत मंत्री नितेश राणे यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली

**महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक सर्वाधिक उत्तम प्रशासक व एक अत्यंत मोठा लोकनेता महाराष्ट्राने कायमचा गमावला : जयंतराव पाटील**

राष्ट्रवादी परिवारातील आम्हा सर्व सहकाऱ्यांच्या आयुष्यातील आजचा दिवस सर्वात वाईट दिवस आहे असेच म्हणावे लागेल. अजितदादांच्या निधनाची बातमी ही अक्षरशः सुन्न करून टाकणारी आहे. अजितदादा आणि माझे गेल्या जवळपास ३५ ते ४० वर्षांपासूनचे मैत्रीपूर्ण संबंध होते प्रदीर्घकाळ आम्ही एकत्र काम केले. महाराष्ट्राच्या राजकीय सार्वजनिक जीवनाला अजितदादा पवार यांच्याकडून अजून मोठ्या कार्याची अपेक्षा असतानाच अशा प्रकारे अजित दादांचे अपघाती निधन आम्हा सर्वांच्या राजकीय जीवनात एक कायमस्वरूपी पोकळी निर्माण करून गेलेले आहे. दादांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे जे नुकसान झाले आहे ते नुकसान कधीही भरून निघणार नाही. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक सर्वाधिक उत्तम प्रशासक व एक अत्यंत मोठा लोकनेता महाराष्ट्राने कायमचा गमावला आहे. अजित दादांची उणीव कायम भासत राहील.

**काम करणारा नेता महाराष्ट्राने नाही तर देशाने गमावला : इम्तियाज जलील**

काम करणारा नेता महाराष्ट्राने नाही तर देशाने गमावला निर्णय घेण्याची क्षमता असलेला नेता म्हणून त्यांची ओळख

पवार परिवाराच्या भावना आता आपण समजू शकत नाही मात्र देव त्यांना या संकटातून सावरण्याची ताकद देऊ.

## सर्वपक्षीय जालना ...

माजी आ. चंद्रकांत दानवे , माजी आ. शिवाजीराव चोथे , माजी आ. संतोष सांबरे, माजी. आ. सुरेश कुमार जेथलिया , शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर , राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष निसार देशमुख , काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख , मनसे जिल्हाध्यक्ष रवी राऊत , विनीत सहानी , सतीश पंच , राजेश राऊत , रिपाई नेते ॲड. ब्रह्मानंद चव्हाण अ. रशीद पैलवान , कॉ. सगीर अहमद ,आण्णा सावंत , राजेंद्र राख , एकबाल पाशा ,भाजपा महानगराध्यक्ष भास्कर दानवे , राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख मेहमूद , डॉ. दयानंद भक्त , अ. भा. मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद , देशमुख, शाहआलम खान, अण्णासाहेब चितेकर, मिर्झा अन्वर बेग, प्रा. सोपानराव तेलगड आदींनी केले आहे.

# समानता नियमावलीच्या नावाखाली सामान्य वर्गावर अन्याय? ॲड. धन्नावत

विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) शैक्षणिक संस्थांमधील जातीय भेदभावाला आळा घालण्यासाठी नुकत्याच अधिसूचित केलेल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये समानतेचा प्रचार नियम, २०२६ या नियमावलीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. या नियमावलीतील काही तरतुदी या केवळ एकतर्फी असून त्या सामान्य प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या आणि त्यांना तक्रार निवारणाच्या अधिकारापासून वंचित ठेवणाऱ्या असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. १३ जानेवारी २०२६ रोजी अधिसूचित करण्यात आलेली ही नियमावली देशातील सर्व उच्च शिक्षण संस्थांना लागू आहे. या नियमावलीचा उद्देश धर्म, वंश, लिंग, जन्मस्थान, जात किंवा अपंगत्व या आधारावर होणारा भेदभाव, विशेषतः अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती , इतर मागासवर्गीय आणि दिव्यांग व्यक्तींविरोधात होणारा भेदभाव रोखणे हा आहे. याकरिता प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेत समान संधी केंद्र आणि समानता समिती स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांनुसार, या नियमावलीतील जाती-आधारित भेदभाव या व्याख्येवर तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. नियमावलीतील कलम ३(क) नुसार, जातीय भेदभाव म्हणजे केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय सदस्यांविरुद्ध त्यांच्या जाती किंवा जमातीच्या आधारावर होणारा भेदभाव. ही व्याख्या अत्यंत संकुचित आणि पक्षपाती असून, ती सामान्य किंवा खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर संरक्षणापासून वंचित ठेवते, असा युक्तिवाद करण्यात आला आहे.

याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, ''सदर नियम हे या चुकीच्या गृहितकावर आधारित आहेत की जातीय भेदभाव केवळ एकाच दिशेने, म्हणजेच केवळ राखीव प्रवर्गातील व्यक्तींवरच होऊ शकतो. यामुळे, सामान्य किंवा उच्च जातीतील व्यक्तींनाही जातीय द्वेष, गैरवर्तन, भीती किंवा संस्थात्मक पूर्वग्रहांना सामोरे जावे लागू शकते, या शक्यतेला कायद्याने पूर्णपणे नाकारले आहे.'' या निवडक आणि एकतर्फी आराखड्यामुळे आरक्षित नसलेल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांविरुद्धच्या भेदभावाला एकप्रकारे कायदेशीर मान्यता मिळते आणि समानतेऐवजी समाजात अधिक दुही निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे, या नियमावलीच्या अंमलबजावणीला सध्याच्या स्वरूपात स्थगिती द्यावी आणि जातीय ओळखीच्या आधारावर तक्रार निवारण यंत्रणेपासून वंचित ठेवणे हे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४, १५(१) आणि २१ चे उल्लंघन करणारे ''अस्वीकार्य राज्य भेदभाव'' आहे, असे घोषित करण्याची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली आहे. या नियमावलीमुळे देशभरातील विद्यार्थी आणि शिक्षक, विशेषतः सामान्य प्रवर्गातील, यांच्यामध्ये चिंतेचे आणि विरोधाचे वातावरण आहे. अनेक ठिकाणी या नियमांविरोधात निदर्शने झाली असून, भेदभाव या शब्दाची स्पष्ट व्याख्या नसल्याने आणि खोट्या तक्रारींविरोधात कोणत्याही दंडात्मक कारवाईची तरतूद नसल्याने, या कायद्याचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. सर्वोच्च न्यायालयाने या याचिका तातडीने सुनावणीसाठी घेण्याचे मान्य केले असून, आता या प्रकरणावरील न्यायालयाच्या निर्णयाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

### विश्वबंधुत्वाचा भाव प्रदर्शीत करणारा महाराष्ट्राचा ५९वा निरंकारी संत समागम भव्य रुपात संपन्न

# सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज कौस्तुभ पुरस्काराने सन्मानित

### शाश्वत निराकार परमात्म्याचा बोध प्रत्येक युगाची आवश्यकता- निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्राचा तीन दिवसीय ५९वा वार्षिक निरंकारी संत समागम २६ जानेवारी रोजी सांगलीमध्ये भव्य रुपात यशस्वीरित्या संपन्न झाला. समागमाच्या समापन सत्रामध्ये सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी लक्षावधी भाविक भक्तगणांना संबोधित करताना सांगितले, की शाश्वत निराकार परमात्म्याचा बोध प्राप्त करुन जीवनात प्रेम, दया आणि करूणेचा भाव अंगीकारणे ही प्रत्येक युगाची आवश्यकता राहिली आहे.

सतगुरु माताजी म्हणाल्या, की मानवाचा दृष्टिकोण बहुधा नकारात्मक होऊन जातो. त्यामुळे तो चांगुलपणामध्येही दोष शोधत राहतो. याउलट संतजन परमात्म्याच्या जाणीवेमध्ये जगून अंधारातही प्रकाश किरणाला आधार बनवतात. ब्रह्मज्ञानाद्वारे ते स्वत:चे जीवन उज्ज्वल करतातच, शिवाय समाजालाही प्रकाशमान करतात.

संतांच्या जीवनाचे वैशिष्ट्य समजावताना माताजी म्हणाल्या, की संतांचे जीवन दिखावा, कट-कारस्थानापासून मुक्त आणि सहज, सरळ व सकळांच्या कल्याणासाठी समर्पित असते. सतगुरु माताजींनी निरंकारी भक्तांना सत्संग, सेवा व सिमरणाच्या माध्यमातून आत्ममंथन करत सजग व सकारात्मक जीवन जगण्याचे आवाहन केले.

समागमाची क्षणचित्रे

कवि दरबार

समागमाच्या तिन्ही दिवशी ‘‘आत्ममंथन’’ या विषयावर कवि दरबाराचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये देश-विदेशातील एकंदर २२ कवी व कवियित्रींनी मराठी, हिंदी, पंजाबी, हरियाणवी, भोजपुरी व इंग्रजी भाषांच्या माध्यमातून काव्य पाठ प्रस्तुत केला ज्याचा भरपूर आनंद श्रद्धाळु भक्तांनी प्राप्त केला.

‘‘कौस्तुभ पुरस्कार’’ देऊन सन्मानित

समागमाच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र स्टेट जर्नलिस्ट्स एसोसिएशन यांच्या वतीने वर्ष २०२६ चा प्रतिष्ठित ‘‘कौस्तुभ पुरस्कार’’ सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री माननीय श्री.चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभहस्ते प्रदान केला गेला. या प्रसंगी असोसिएशनचे संस्थापक श्री.संजयजी भोकरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

निरंकारी मिशनच्या नूतन साहित्याचे प्रकाशनः

समागमाच्या पहिल्या दिवशी सत्संग कार्यक्रमा दरम्यान सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या करकमला द्वारे समागम विशेषांक ‘‘आत्ममंथन’’ आणि ‘गुरूदेव हरदेव’ या पुस्तकाची नूतन भाषांतर आवृत्ती तसेच अन्य पुस्तकांच्या भाषांतर आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या सर्व प्रकाशन सामग्री व मिशनच्या पत्र-पत्रिका समागम मध्ये लावलेल्या प्रकाशनाच्या ६ स्टॉल्सवर अत्यंत माफ़क दरात उपलब्ध आहेत ज्याचा लाभ श्रद्धाळू भक्तगण मोठ्या उत्साहाने घेत आहेत.

*सेवादल रॅली*

समागमाच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात एका आकर्षक सेवादल रॅलीने झाली ज्यामधेय महाराष्ट्रासह अन्य ठिकाणांहून आलेल्या हजारो सेवादल बंधु-भगिनी आपआपली खाकी-निळी वर्दी परिधान करून सहभागी झाले होते. सतगुरू माताजी व निरंकारी राजपिताजींचे रॅलीमध्ये आगमन होताच मंडळाच्या सेवादल आधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन या दिव्य युगुलाचे सहर्ष स्वागत केले.



सेवादल रॅलीच्या प्रारंभी सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी आपल्या करकमलाद्वारे शांतीचे प्रतिक असणारा मिशनचा श्वेत ध्वज फ़डकवला. या रॅलीमध्ये बँण्डच्या सूरात पी.टी. परेड, संगीतमय योगा, मानव पिरॅमिड, मल्लखांब, एरोबिक, उम्ब्रेला फॉर्मेशन तसेच अनेक विविध खेळ प्रकार व साहसी कवायती प्रस्तुत केल्या. त्याचबरोबर मिशनच्या शिकवणीवर आधारित विविध भाषांच्या माध्यमातून लघु नाटिका सादर करण्यात आल्या ज्याद्वारे भक्तीमधील सेवेचे महत्व अधोरेखित केले गेले तसेच अहंकार रहित होणे, सेवेमधील चेतनता व आदर भाव इत्यादी दिव्य गुण धारण करण्याची प्रेरणा देण्यात आली.

सेवादल व श्रद्धाळू भक्तगणांना संबोधित करताना सतगुरू माता सुदीक्षाजी महाराजांनी प्रतिपादन केले, की जीवनात निराकार परमात्म्याला प्राथमिकता देत समर्पित भावनेने सेवा करायची आहे. सेवा केवळ एक कार्य नसून ते पूर्ण मनोभावे श्रद्धा व सत्कार भावनेने करायची भावना आहे. सेवेच्या सोबत जीवनात सत्संगला महत्व देणे सुद्धा सेवेचेच एक रूप आहे. सेवेच्या मूळ भावनेला समजून केले गेलेले कार्यच जीवनामध्ये सुधार करते.

निरंकारी प्रदर्शनी

समागमात उभारलेली भव्य निरंकारी प्रदर्शनी श्रद्धाळूंच्या आकर्षणाचे केंद्र बनली आहे. या वर्षी सदर प्रदर्शनी ‘आत्ममंथन’ या विषयावर आधारित असून ज्यामध्ये आत्मचिंतन, आत्मबोध आणि मानवी मुल्यांचे महत्व अत्यंत प्रेरणादायी पद्धतीने प्रस्तुत केले आहे. ही प्रदर्शनी मुख्यतः तीन भागांमध्ये विभागली आहे. तिच्या मुख्य भागात मिशनचा इतिहास, विचारधारा तसेच देश-विदेशात केले जाणारे मानवतेसंबंधी निष्काम सेवा कार्यांचे प्रतिबिंब दर्शवले आहे. दुसऱ्या भागात ‘‘बाल-प्रदर्शनी’’ उभारली असून त्यामध्ये बालकांना उज्ज्वल जीवन जगण्याची प्रेरणा देणारे शिक्षाप्रद आकर्षक मॉडेल्स बनवले आहेत ज्याचा उल्लेख निरंकारी राजपिताजी यांनी आपल्या विचारांमध्येही केला. प्रदर्शनीच्या तिसऱ्या भागात मिशनची समाजकल्याण शाखा ‘संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन’च्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनीचा समावेश आहे.

लंगर व कँटीन व्यवस्था

समागमात येणाऱ्या सर्व श्रद्धाळूंसाठी दिवस-रात्र सामूहिक भोजनाची (लंगर) व्यवस्था मैदानाच्या तिन्ही भागांमध्ये केली आहे. एका लंगर स्थानावर एकाच वेळी जवळपास १0,000 श्रद्धाळू भोजन करू शकतात. या व्यतिरिक्त ४ कँटीनची व्यवस्था करण्यात आली आहे ज्यामध्ये अत्यल्प दरात चहा, कॉफी, शीत पेय व अल्प-उपहार उपलब्ध आहेत. मिनरल वॉटरची देखील उचित व्यवस्था याच कॅन्टीनमध्ये करण्यात आली आहे.

स्वास्थ्य सेवा समागम स्थळावर तीन डिस्पेंसरी, दोन प्राथमिक चिकित्सा केंद्र तसेच आईसीयू सुविधेसहित हॉस्पिटलची व्यवस्था केलेली होती. अॅलोपॅथी, आयुर्वेद व होमिओपॅथी पद्धतिने जवळ जवळ ५0,000 भाविकांना स्वास्थ सेवा प्रदान केल्या गेल्या. या व्यवस्थेमध्ये ५४ डॉक्टर्स व ३२६ चिकित्सा कर्मचारी कार्यरत होते. आपत्कालीन परिस्थितीत सेवेसाठी ११ अॅम्ब्युलन्स तैनात होत्या.

कायरोप्रॅक्टिक चिकित्सा शिबिर

प्रशंसनीय आहे, की कायरोप्रॅक्टिक चिकित्सा शिबिरामध्ये विदेशातून २३ तर भारतातून २ विशेषज्ञांनी आपल्या निष्काम सेवा प्रदान केल्या. तीन दिवसांमध्ये जवळपास ३,000 भाविकांनी या चिकित्सेचा लाभ घेतला.




# केमिस्ट बांधवांच्या सहभागातून उभारलेला 'केमिस्ट कल्चरल हॉल' हडपण्याचा प्रयत्न हाणून पाडला!

## साईनाथ पवार यांचा कुटील डाव उधळला-प्रमोद तोतला; केलेल्या कर्माची फळे भोगावीच लागणार -संजय बोबडे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील औषधी विक्रेत्यांच्या (केमिस्ट) हक्कांचा, संघटनेच्या मालमत्तेचा आणि लोकशाही प्रक्रियेचा बळी देत स्वतःच्या स्वार्थासाठी संघटनेचा तब्बल ७ हजार चौरस फुटांचा केमिस्ट कल्चरल हॉल स्वतःच्या मुलाच्या दुकानासाठी रजिस्टर करून देण्याचा कुटील डाव औषधी संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार यांनी रचल्याचा गंभीर आरोप केमिस्ट बांधवांनी केला आहे. मात्र, केमिस्ट बांधवांच्या संघटित लढ्यामुळे हा डाव यशस्वीपणे हाणून पाडण्यात आला असल्याची माहिती प्रमोद तोतला यांनी दिली. या संदर्भात बोलताना तोतला म्हणाले की, हा हॉल केमिस्ट बांधवांच्या वर्गणीतून आणि सहभागातून उभारण्यात आलेला सामूहिक मालमत्ता स्रोत आहे. कोणतीही सर्वसाधारण सभा न घेता, कोणताही ठराव मंजूर न करता, अध्यक्षांनी मनमानी पद्धतीने लीज डीड करून देणे म्हणजे थेट विश्वासघात आहे. हा प्रकार लक्षात येताच केमिस्ट बांधवांनी मार्केट कमिटीचे सभापती तथा आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली. आमदार खोतकर यांनी सर्व बाबी समजून घेत या प्रकरणाला तात्काळ स्थगिती दिली.

यासोबतच हा गंभीर प्रकार अन्न व औषध प्रशासन () तसेच राज्यस्तरीय औषधी संघटनेकडेही लेखी स्वरूपात कळविण्यात आला आहे. ''साईनाथ पवार यांनी गिळंकृत करण्याचा प्रयत्न केलेला हा सभासदांचा हॉल परत सभासदांच्याच ताब्यात ठेवण्यात आम्ही यशस्वी ठरलो,'' असे तोतला यांनी ठामपणे सांगितले.

**१३ वर्षांत लोकशाहीचा गळा दाबला?**

केमिस्ट बांधवांच्या मते, गेल्या १३ वर्षांच्या कार्यकाळात साईनाथ पवार यांच्या अध्यक्षपदाच्या काळात संघटनेत लोकशाही प्रक्रियाच पायदळी तुडवण्यात आली. दर तीन वर्षांनी निवडणूक अपेक्षित असताना पाच निवडणुकांपैकी फक्त एकच निवडणूक झाली. तीही निवडणूक मनमानी व मॅनेज पद्धतीने घेण्यात आली, असा आरोप आहे. एकदाही वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली नाही, हिशोब-पत्रक किंवा ऑडिट रिपोर्ट सभासदांसमोर मांडण्यात आले नाहीत. हे सर्व प्रकार संघटनेच्या अस्तित्वालाच धोका पोहोचवणारे असल्याचे केमिस्ट बांधवांचे म्हणणे आहे.

**होलसेलर्सवर अन्याय, स्वतःच्या दुकानाला फायदा?**

आरोपांनुसार, कोणतीही होलसेलर्सची बैठक न घेता साईनाथ पवार यांनी स्वतःच्या दुकानात एका वर्षात तब्बल ३५ एजन्सी लाईन्स करून घेतल्या. ३०-३५ वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या जुन्या केमिस्टनाही इतक्या लाईन्स मिळालेल्या नाहीत. यामुळे इतर होलसेलर्सचे व्यवसाय ठप्प झाले असून हा प्रकार स्पष्ट हितसंबंधांच्या संघर्षाचा नमुना असल्याचे सांगण्यात आले.

**पूर्वी संघटना म्हणजे सक्रिय चळवळ होती.** प्रमोद तोतला व सहकाऱ्यांच्या कार्यकाळात केमिस्ट बांधवांसाठी सहली, वार्षिक विमा योजना, प्रशिक्षण शिबिरे, वर्षातून दोनदा मनोरंजन व मार्गदर्शन सभा, असे अनेक उपक्रम नियमित होत होते. मात्र साईनाथ पवार यांच्या काळात हे सर्व उपक्रम पूर्णतः बंद झाल्याची खंत व्यक्त करण्यात आली. ''आज संघटना म्हणजे फक्त व्हॉट्सॲपवर हैप्पी बर्थडे मेसेज टाकण्यापुरती मर्यादित राहिली आहे,'' अशी तीव्र टीका करण्यात आली.

**उपोषणातून इशारा; पुढील लढा कायदेशीर मार्गाने**

शेवटचा पर्याय म्हणून २७ जानेवारी रोजी केमिस्ट बांधवांनी उपोषण केले. उपोषणाला जेष्ठ औषधी विक्रेत्यांसह तरुण केमिस्टांची मोठी उपस्थिती होती. १५० हून अधिक सदस्यांनी सहभाग नोंदवला. धन्वंतरी पूजन करून सकाळी उपोषणास सुरुवात झाली आणि सायंकाळी ५ वाजता उपोषणाची सांगता झाली. यावेळी सर्व आरोपांची लेखी पुराव्यासह माहिती सादर करण्यात आली.

या प्रकरणामुळे केवळ एका संघटनेतील अंतर्गत संघर्ष समोर आलेला नसून, स्थानिक पातळीवरील सहकारी संघटनांमध्ये पारदर्शकता, लोकशाही आणि जबाबदारी किती आवश्यक आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. आता सर्वांचे लक्ष याकडे लागले आहे की, साईनाथ पवार यांच्याविरोधातील आरोपांवर शासन, आणि राज्य संघटना काय भूमिका घेतात.

उपोषण यशस्वी करण्यासाठी संजय बोबडे, मनोज कुमकर, मंगेश वाणी, मनोज अग्रवाल, लक्ष्मीनारायण मानधना, गंगाधर जायभाये, अनंत पालकर, सुधीर घाडगे, नीरज मंत्री, रामेश्वर पवार, गिरीश बाफना, दशरथ पडुळ, किशीर जुनगडे, मयूर लड्डा, सूचित लड्डा, बबला भारदिया इत्यादीनी प्रयत्न केले.

याप्रसंगी प्रमोद तोतला ,संजय बोबडे, श्रीनिवास सिकची, बिरज करवा, मनोज कुमकर, सुधीर मंत्री, सत्यनारायण सारडा, अमजद खां उर्फ गुड्डू भाई, अनिल खंडेलवाल, मंगेश वाणी,महावीर सोडानी, गोपाल बांगड, अनंत पालकर, अनिल अग्रवाल, संदीप राठी, किशोर जुनगडे, लक्ष्मीनारायण मानधना, आसिफ मय्यरवाले, रोहित नारले, निवृत्ति मावस्कर, रामेश्वर पवार, वसंत बुनगे,दिनेश लाहोटी, गादिया,बंडू परदेसी मो.फरीद शेख साजिद, तन्मय टकले,परेश वाणी विजय मोहता, नीरज मंत्री,संदीप नावन्दर सुनील थोरात,अरुण भक्कड हितेश भरवाड़ा,श्रेयस सूर्यवंशी मुकेश कालड़ा,वरद लड्डा, आनंद इंजे, विशाल लड्डा कीर्ति सावजी,अल्केश लड्डा, राजू बनकर राजेन्द्र अग्रवाल महेश वाणी संतोष बियानी प्रवीण सावंत त्रिवेणी सावंत,अंकुश शिंदे, अरुण सावंत नंदू मावस्कर अरुण मावस्कर, सचिन जाधव ऋषि कोड़के,रवि अनपट, अजय नाइकवड़े,आरती दिनेश लाहोटी, विट्ठल बनकर,विवेक सोनी, कपलि




अशोक लाहोटी, शिवहरी शिंदे, अनिल राठोड, गंगाधार जायभाये, प्रदीप मंत्री, आनंद वरियानी, सुधीर घाडगे, विनोद ठाकुर, राजेन्द्र बाहेती रविन्द्र लोया,राहुल अग्रवाल,श्रीकांत करवा, सचिन चरखा, प्अनिल लदनिया आकाश जिगे,योगेश टेपले मनोज अग्रवाल,विठ्ठलदास बगड़िया, शिवरतन करवा, गणेश चिड़े,संजय काबरा महेंद्र शैलेश मुगदीया,उमेश मुगदीया, शुभम तोषनीवाल,बाळकृष्ण रासने विनोद देशमाने,सुभाष वनारसे, योगेश कदम, नामदेव पवार विजय जायभाये,मुकुंद पालकर संगीता जायभाये,आनंद समदानी संजय राठी, उद्धव देशमुख संदेश आघाव,अशोक तोशनिवाल राजकुमार तोषनीवाल, अनिल राठी,सौरभ जाधव कौस्तुभ जोशी बाहेती,दशरथ पडुळ, जयेश तोतला, प्रसाद भूतडा सुदर्शन कुमकर,राजेंद्र तापडिया, अमोल गायकवाड़,अभिषेक माने, पवार कृष्णा महादेव आघाव नीलेश काला, गिरीश बाफना रामजीवन तोतला,मुकेश चरखा, मनोज चरखा,स्वप्निल राजपूत, प्रतीक जाधव,यांच्यासह अनेक केमिस्ट बांधव उपोषना वेळी हजर होते.

---

# नैसर्गिक अनुदान घोटाळ्यात आणखी ३ तलाठी अटकेत; आर्थिक गुन्हे शाखेची कामगिरी

## न्यायालयाकडुन ४ दिवसाची पोलीस कोठडी; अद्यापपर्यंत २७ आरोपीतांना अटक

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैर्सगकि आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामध्ये शासनाने वेळोवेळी ०४ जी आर काढुन बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर केले होते. त्यामध्ये अंबड व घनसावंगी तालुक्यात यादया अपलोडींगचे काम काज करणारे संबंधीत अधिकारी कर्मचारी यांनी मोठया प्रमाणावर बोगस (शेती नावावर नसलेले) नावे यादया मध्ये अपलोड करुन त्यांचे नावे आलेल्या शासनाचे अनुदानाची रक्कम त्यांचे कडुन परस्पर परत घेतल्या संबंधी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी चौकशी समीती गठीत केली होती.

चौकशी समीतीने चौकशी करुन एकुण २४० गावामध्ये २४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार झाला असल्या बाबत अहवाल दिल्यानंतर सदर प्रकरणात २२ तलाठी, तहसिल कार्यालयातील नैसर्गीक आपत्ती व्यवस्थापन विभागातर्गत कामकाज करणारे ०५ कर्मचारी व जिल्हाधिकारी कार्यालय येथे नैसर्गीक आपत्ती व्यवस्थापन कार्यालयात काम करणारा १ असे एकुण २८ आरोपी विरुध्द पो. स्टे. अंबड येथे गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ६१(२), ३(५) सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर प्रकरणात गुन्हा नोंद झाले पासुन आरोपी फरार झाले होते ते पोलीसांचे नजरेआड राहत होते. आरोपी पोलीस शोध घेऊन नये या साठी मोबाईल वापरत नव्हते तसेच सोशल मिडीया पासुन सुध्दा लांब राहत होते. त्यामुळे त्यांचे अटकेसाठी अडसर येत होते तरी सुध्दा त्यांचा शोध घेत आर्थिक गुन्हे शाखेने यापुर्वी एकुण २० आरोपीना अटक केली आहे.

गुन्हयातील आरोपी हे गुन्हा नोंद झाल्यापासुन पोलीसांचे नजरे आड राहत आरोपीतानी प्रथम मा.जिल्हा व सत्र न्यायालय अंबड येथे अटकपुर्व जामीन साठी अर्ज सादर केले होते. ते अर्ज फ`टाळुन लावल्यानंतर आरोपी हे उच्च न्यायालय महाराष्ट्र राज्य मुंबई खंड पिठ छत्रपती संभाजीनगर येथे अटकपुर्व जामीन मिळावा या साठी अर्ज सादर केले होते सदर प्रकरणात तपास अधिकारी यांनी गुन्हयात सखोल तपास करुन पुराव्यानिशी कागदपत्रे मा.न्यायालयात वेळेत सादर केल्याने मा.न्यायालयाने वेळोवेळी सुनावणी घेऊन आरोपीचे सर्वच अटकपुर्व जामीन अर्ज फेटाळलेले आहेत.

गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असताना आरोपी नामे १) सुरज गोरख बिक्कड वय ३६ वर्षे व्यवसाय नौकरी तलाठी, रा. फतराबाद, ता. वाशी जिल्हा धाराशिव ह.मु. मयुर नगर अंबड ता.जि. जालना २) मोहित दत्तत्रय गोषिंक वय ३६ वर्षे व्यवसाय नौकरी-तालठी, रा. पोलास गल्ली जालना ३) विठठल प्रल्हाद गाढेकर वय ३८ वर्षे व्यवसाय नौकरी-तलाठी, रा. काचननगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. आयोध्या नगर अंबड रोड जालना यांना आज दिनांक २८/०१/२०२६ रोजी ताब्यात घेऊन अटक करण्यात येऊन त्यांना मा. न्यायालयासमक्ष मध्ये हजर केले असता मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अंबड कोर्ट २ रे यांनी आरोपीना ४ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. आज रोजी पावेतो नमुद गुन्हयात २७ आरोपीना अटक करण्यात आली असुन इतर फरार आरोपी व एंजटचा शोध सुरु आहे.

सदरची कामगीरी ही मा. श्री अजयकुमार बंन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना, श्री सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजु भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे (माऊली), ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जया निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी पार पाडली आहे.

---

# रस्त्याच्या मागणीसाठी आमदार अर्जुन खोतकर यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील अहंकार देऊळगाव ते माळाचा गणपती दरम्यान जाण्यासाठी असलेल्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सोमवार दि.२६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनभाऊ खोतकर आणि पालकमंत्री पंकजाताई मुंढे आणि जिल्हा प्रशासनाला या संदर्भात निवेदन दिले आहे.दरम्यान या गावाच्या रस्त्यासाठी गावकर्यांनी ग्रामसभेत ठराव घेऊन रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली.शाळेतील मुलांना,गरोदर महिलांना,वृध्द नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे गावच्या रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण करावे अशी मागणी गावकर्यांनी केली. सामाजिक कार्यकर्ते अमोल खरात यांच्या सह गावातील नागरिक मोकिंद खरात, पिराजी खरात, बद्रीनाथ वाढेकर, राजू खरात, राहुल खरात, गोविंद खरात,अशोक सोमधाने, शरद खरात,राहुल रामभाऊ खरात, व्यंकटेश गंडाळ, आकाश सोमधाने, यांची उपस्थिती होती. निवेदनावर प्रभारी सरपंच गणेश डोईफोडे, उपसरपंच देविदास सोमधाने, ग्रामसेवक राहुल सातपुते, यांच्या सह गावातील विलास खरात, सिद्धार्थ गवई, पद्माकर खरात,नंदू खरात, बाबासाहेब खरात, बाकीलाल सरकटे, उत्तम खरात, विशाल बाजीराव गवई, कचरु खरात, कैलास सोमधाने, उमाजी येवले, सिद्धेश्वर डोईफोडे, कपिल म्हस्के, हिरालाल खरात, मिलिंद खरात, वैभव खरात, महेंद्र खरात, आत्माराम खरात, भिकुलाल खरात, संदीप काकडे, संतोष वाहुळे, रतन खरात, सुरेश खरात, सदानंद शिंदे, दिपक म्हस्के, अनिल गवई, स्वप्नील खरात, अनुराग खरात, शरद वढेकर, अजय वाढेकर, नितीन वाढेकर आदींच्या सह्या आहेत.



---

# जालना समाजकार्य महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**जालना -** कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के उपस्थित होते यावेळी सर्वप्रथम डॉ.राजकुमार म्हस्के यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले तदनंतर प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमात संविधानाच्या उद्देशीकेचे सामूहिक वाचन करण्यात आले कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी रमेश गजर उपप्राचार्य डॉ. मधु खोब्रागडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दीपक बुत्तरे,. सुधीर गायकवाड, डॉ. नरसिंग पवार, डॉ. रेणुका बडवणे,डॉ. मीना बोर्डे,डॉ. बालाजी मुंडे,संजय देशमुख, विकास लाखे,प्रकाश दांडगे, अनिल हजारे, किशोर ढेकळे, ऋषीं पाटील, विष्णु भोसले, रामू एखण्डे, दत्ता रेवले, राधाकृष्ण देशमुख,शाम कांबळे,बिभीषण शेजूळ,संजय गोरे,संजय गाडे, सुंमत माने,संदीप जगताप,अनिल वाघमारे,अंजिराम जाधव,राजू वाघमारे,ईश्वर चव्हाण आदी उपस्थित होते.

---

# ताराबाई वसंतराव पोलास यांचे निधन

## पोलास कुटुंबियांवर शोककळा; परिसरात हळहळ

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पोलासगल्ली परिसरातील रहिवासी तथा राजू पोलास, मार्शल पोलास आणि शिवकुमार पोलास यांच्या मातोश्री ताराबाई वसंतराव पोलास (वय ७९) यांचे आज बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी दुःखत आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने पोलास कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

ताराबाई पोलास या शांत, संयमी, कुटुंबवत्सल आणि धार्मिक वृत्तीच्या महिला म्हणून परिचित होत्या. त्यांनी आपल्या कुटुंबावर उत्तम संस्कार घडवत समाजात सन्मानाचे स्थान निर्माण केले. कष्ट, त्याग आणि मायेच्या जोरावर त्यांनी आपल्या मुलांना घडविले. त्यांचे संपूर्ण



आयुष्य कुटुंबासाठी समर्पित होते.

त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने कुटुंबीयांबरोबरच नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोक व्यक्त केला जात आहे. दरम्यान, अंत्यविधी गुरुवार, दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता पोलासगल्ली येथील राहत्या घरापासून अमरधाम शेरी (मुथा बिल्डिंग जवळ) येथे होणार आहेत.

अनेक सामाजिक, राजकीय, व्यापारी आणि नागरिकांनी पोलास कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन व्यक्त केले असून ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो, अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.